# उद्योग संचालनालय,
# जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर

**१) जिल्हा उद्योग केंद्राची पार्श्वभूमी :-**

जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना सन १९७९ मध्ये झाली.

उद्देश जिल्हयातील लघुउद्योगांना प्रोत्साहन देवून एकाच छत्राखाली आर्थिक व उद्योग विकासाठी सर्वप्रकारची मदत देणे व सुशिक्षीत बेरोजगारांसाठी स्वयंरोजगाराच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन उद्योग वाढीसाठी मदत करणे

**२) जिल्हा उद्योग केंद्रामार्फत खालील योजना राबविल्या जातात.**

१) नवीन उद्योग स्थापन करणेसाठी लघु उद्योग नांदणी

२) इरादा पत्र प्राप्त मोठे उद्योगांना परदेशी गुंतवणक /उद्योग स्थापनेचे दृष्टीकोनातून मदत करणे

३) जिल्हातील बेरोजगाराना उद्योग/व्यवसाय/व्यापाराची संधी उपलब्ध करणेसाठी (अ) बिजभांडवल कर्ज योजना ब) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (पीएमईजीपी)

४) ग्रामीण भागातील उद्योग वाढीसाठी जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना

५) नवीन उद्योग/व्यवसाय सुरु करणेसाठी उद्योजकासाठी उद्योजकता प्रशिक्षण मेळावे आयोजन

६) जिल्हयातील यशस्वी लघु उद्योजकाना जिल्हा पुरस्कार

७) जिल्हयातील उद्योजकाना सामुहीक प्रोत्साहन योजनेअंतर्गत अनुदान तसेच आजारी उद्योगाचे पुनर्वसन

८) जिल्हयामध्ये उद्योग समुह तयार करुन त्यांना शासकिय योजनेचा लाभ मिळवून देणे

**३) जिल्हयातील लघुउद्योग घटकाची माहीती**

भारत सरकारने (केंद्र शासनाने ) मायक्रो, स्मॉल, मेडीयम एंटरप्रायझेस डेव्हलपमेंट ॲक्ट २००६ दि.१६ जून २००६ अन्वये कायदा अंमलात आला असून, तो दि.२ ऑक्टोंबर २००६ पासून लागू करण्यात आलेला आहे.

या कायद्यान्वये उद्योगाचे पुढीलप्रमाणे तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहे.

१) मायक्रो एंटरप्रायझेस (सुक्ष्म उपक्रम), २) स्मॉल एंटरप्रायझेस (लघु उपक्रम) आणि ३) मेडीयम एंटरप्रायझेस (मध्यम उपक्रम) यांची व्याप्ती खालीलप्रमाणे आहे.

| अक्र | उद्योगाचा प्रकार | यंत्रसामुग्री मधील गुंतवणूक | |
|---|---|---|---|
| | | सेवा | उत्पादन |
| १ | मायक्रो एंटरप्रायझेस (सुक्ष्म उपक्रम) | रु.१० लाखा पर्यंत | रु. २५ लाखा पर्यंत |
| २ | स्मॉल एंटरप्रायझेस (लघु उपक्रम) | रु. १० लाख ते रु. २ कोटी पर्यंत | रु. २५ लाख ते रु ५ कोटी पर्यंत |
| ३ | मेडीयम एंटरप्रायझेस (मध्यम उपक्रम) | रु. २ कोटी ते रु.५ कोटी पर्यंत | रु . ५ कोटी ते रु.१० कोटी पर्यंत |

सदरील कायदा व त्या पूर्वीच्या शासन निर्णयाप्रमाणे जिल्हयातील माहे मार्च -२००९ अखेर एकूण १२३६८ स्थायी लघु उद्योग नोंदणी झाली असून, सदर उद्योगांमध्ये ९०८१९ रोजगार निर्मिती झालेली आहे. यामध्ये एकूण रु ४०९८कोटीची गुंतवणूक झाली आहे. लघु उद्योगात प्रामुख्याने वस्त्रोउद्योग,कॉटन फॅब्रिक्स्, फौंड्री लेदर अर्टिकल,इंजिनिअरिंग जॉबवर्क, कास्टींग, ॲटा पार्ट, स्टीं ल, ट्रॅक्टर ट्रॉली, इंजिन पार्ट, इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रॉनिक, काजू प्रक्रिया, व शतीवर अधारित लघुउद्योग घटकांचा समावेश आहे.

तसेच जिल्हयामध्ये एकूण १५२२९ अस्थायी लघु उद्योग घटकांची नोंदणी झाली असून, प्रस्तावित उद्योगामध्ये अंदाजे रु १२०९४५ कोटी गूंतवणूक व ८१३५७ रोजगार निर्मिती होऊ शकेल.

### ४) मोठे व मध्यम उद्योग -

जिल्हयातील केंद्र शासनाकडून परवाना मिळालेल्या उद्योग घटकांची एकूण संख्या ५८० पैकी २५४ उद्योग घटकांनी उत्पादन सुरु केले असून, त्यापैकी ७३ वस्त्रोद्योग आहेत. २० साखरकारखाने आहेत, ५८ फौंड्री आहेत. ४१ कृषि अधारित ६२ उद्योग घटक अभियांत्रिकी, पोल्ट्री, पशुखाद्य, खते, दुग्ध व्यवसाय आणि इतर प्रकारच्या क्षेत्रातील उद्योग घटक आहेत .भविष्यात मोठे व मध्यम उद्योग कोल्हापूर परिसरात स्थापित होण्यासाठी पंचतारांकित औद्योगिक वसाहतीसारख्या योग्य पायाभूत सुविधा असलेल्या औद्योगिक वसाहती असल्याने मोठया प्रमाणावर वाव आहे.

या एकूण २५४ उद्योग घटकांतील गुंतवणूक रु २९१४ कोटी असून, रोजगार निर्मिती ४१८६३ इतकी आहे.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची जिल्हयातील औद्योगिक क्षेत्र

जिल्हयामध्ये अस्थितत्वात व प्रस्तावित असे एकूण ६ औद्योगिक क्षेत्रे आहेत

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ** दिनांक ३१.०३.२००९ अखेर

| अ. क्र | वसाहतीचे नांव | भूखंड संख्या | स्थापित उद्योग संख्या | गुंतवणूक (रु. कोटीत) | कामगार संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिरोली हातकणंगले | ७४७ | ६१७ | ४१२ | ९६५३ |
| २ | गोकुळ शिरगांव करवीर | ८१० | ६४६ | ४२५ | ९५४२ |
| ३ | पंचतारांकित कागल | ९८४ | १७२ | १५५९ | २२७४८ |
| ४ | हलकर्णी, चंदगड | ४० | ३ | ३१ | ४३६ |
| ५ | गडहिंग्लज | १२५ | ७ | ७ | २५९ |
| ६ | आजरा | ४३ | ११ | ४ | ७८ |
| | | २७४९ | १४५६ | २४३८ | ४२७१६ |

### ५) सहकारी औद्यो. वसाहती सद्यस्थिती :-

जिल्हयामध्ये सहकारी क्षेत्रामध्ये शासन मान्यताप्राप्त ११ सहकारी औद्योगिक वसाहती असून, त्यापैकी १० औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योग घटक स्थापन झालेले आहेत.

## कोल्हापूर जिल्हयातील सहकारी औद्योगिक वसाहती

दिनांक ३१.०३.२००९ अखेर

| अ. क्र | वसाहतीचे नांव | भूखंड संख्या | स्थापित उद्योग संख्या | गुंतवणूक (रु. कोटीत) | कामगार संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | कोल्हापूर उद्यम को-ऑप सोसायटी - कोल्हापूर | ३२० | ३२० | ४१२ | ८४६२ |
| २ | पार्वती शिरोळ सह. औद्यो. वसाहत यड्राव, ता. शिरोळ, | ७२९ | २२७ | ५३४ | १७२३४ |
| ३ | इचलकरंजी हातकणंगले सह. औद्यो .वसाहत ता. हातकणंगले | ७९९ | ७०९ | ८९३ | १३९८५ |
| ४ | छ. शाहू सह. औद्यो., वसाहत शिरोळ ता. शिरोळ | १८९ | १५६ | १४७ | २७४९ |
| ५ | ल. क. अकिवाटे औद्योगिक वसाहत, जयसिंगपूर, ता. शिरोळ | १९४ | १३० | ३४३ | १८३२९ |
| ६ | यशवंत हातकणंगले सह. औद्यो .वसाहत,हुपरी, ता. हातकणंगले | १२९ | २५६ | ३ | २१४३ |
| ७ | लक्ष्मी सह. औद्यो. वसाहत, हातकणंगले, ता. हातकणंगले | ४९७ | २४९ | ६१४ | ४८५१ |
| ८ | कुरुंदवाड सह.औद्यो.वसाहत, कुरुंदवाड, ता. शिरोळ | ४० | २ | ५० | ३० |
| ९ | यशवंतराव चव्हाण सह औद्यो.वसाहत, मुरगुड, ता. कागल | ७० | ५ | १ | १२५ |
| १० | हिरण्यकेशी सह औद्यो.वसाहत, हासुर चंपू, ता. गडहिंग्लज | ६२ | ५ | २ | १७४ |
| ११ | लक्ष्मी महेश सहकारी औद्योगिक वसाहत, अब्दुललाट, ता. शिरोळ | ४० | ०० | ०० | ०० |
| | | ३०६९ | २०५९ | २४४९५ | ६८०८२ |

## १) क्लस्टर (औद्योगिक समुह विकास)

सदरील योजना केंद्रशासनाने पुरस्कृत केली आहे. एकाच प्रकारचे उद्योग विशिष्ट भागात वाढल्यामुळे त्या उद्योगाला आवश्यक असणारे अंतर्भुत सोई एकाच छत्राखाली मिळून उद्योगाची वाढ चांगल्या प्रकारे होण्यासाठी केंद्रशासनाने एकूण प्रकल्पाच्या ७५ टक्के (जास्तीत जास्त रु.५० कोटी पर्यंत) अनुदान देय केले आहे.

**अ) <u>टेक्सटाईल क्लस्टर</u>** :- (Industrial Infrastrcture Upgredation Scheme) I.I.U.S.

केंद्र शासनाने इचलकरंजी औद्योगिक वस्त्रोद्योग समुंहास मंजुरी दिली आहे इचलकरंजी नगरपालिका ४४ कोटी ५७ लाख, इचलकरंजी इंडस्ट्रीयल इस्टेट १ कोटी ४० लाख, दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन सोसायटी ७ कोटी ७० लाख, लक्ष्मी को-ऑप. औद्यो.वसाहत ६ कोटी ६१ लाख, पार्वती को-ऑप.औद्यो. वसाहत ४ कोटी ७७ लाख रुपये मिळून ६५ कोटी रुपयाची योजना मंजूर केली आहे त्यामध्ये रस्ते, ड्रेनेज व पाणी पुरवठा योजना कॉमन फॅसीलिटी सेंटर व सांडपाणी प्रक्रिया केंद्र (सी.ई.टी.पी.)यांच अंतरभाव आहे फायर ब्रिगेड, रस्ते व ड्रेनेज तसेच कॉमन फॅसीलीटी सेंटर मध्ये दत्ताजीराव कदम टेक्नीकल एज्युकेशन सोसायटीसाटी मंजुर तीन इमारतींचे काम पुर्ण् झालेले आहे. सामुंहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (सी.ई.टी.पी.) इचलकरंजी व लक्ष्मी औद्योगिक वसाहत या मधील कामे प्रगती पथावर असुन पार्वती को-ऑप इंडस्ट्रियल इस्टेट मधील कामे प्रगतीपथावर आहेत. दि.३१.१.२००९ अखेर रु.५०.३७ कोटीचे कामे पूर्ण झालेले आहेत.

**<u>ब) फौंड्री क्लस्टर</u>** :-

कोल्हापूर जिल्हयात कोल्हापूर शहर व परिसरात फौंड्री उद्योग व फौंड्री सलग्न उद्योग घटकासाठी कोल्हापूर जिल्हा फौंड्री क्लस्टर या नावांने नुकतीच S.P.V. (Special Purpose Vical) रजिस्टर ऑफ कंपनीने मान्यता दिली असून या प्रकल्पास केंद्र शासनाने तत्वतः मान्यता देवून यामध्ये कांही सुधारणा सूचित केल्याप्रमाणे सुधारित प्रकल्प अहवाल सादर करण्यात येत आहे

**क) कोल्हापूरी चप्पल**

कोल्हापूरी चप्पल औद्योगिक समुहाचा विश्लेषणात्मक अहवाल केंद्र शासनाने मंजूर केला आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे. समुहाचे सभासदांना प्रशिक्षणाची कार्यवाही प्रस्तावित आहे.

**ड) सिल्व्हर ऑरनॉमेंट**

सिल्व्हर ऑरनॉमेंट औद्योगिक समुहाचा विश्लेषणात्मक अहवाल केंद्र शासनाने मंजूर केला आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे. समुहाचे सभासदांना प्रशिक्षणाची कार्यवाही प्रस्तावित आहे.

**ई) इचलकरंजी गारमेंट क्लस्टर, इचलकरंजी**

इचलकरंजी गारमेंट क्लस्टर, इचलकरंजी समुहाचा विश्लेषणात्मक अहवाल केंद्र शासनाने मंजूर केला आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे. समुहाचे सभासदांना प्रशिक्षणाची कार्यवाही प्रस्तावित आहे.

## २) <u>इंटिग्रेटेड पार्क</u> : (केंद्र शासन पुरुस्कृत)

**कोल्हापूर जिल्हयामध्ये केंद्र शासनकडून खालील तीन संस्थांना मंजूरी देण्यात आली आहे**

केंद्र शासनाच्या Scheme of Integrated Textile Park या योजनेतून मान्यता आहे.

**१) धैर्यशील माने टेक्स्टाईल पार्क को-ऑप. सोसा., कागल-हातकणंगले पंचतारांकि औद्योगिक वसाहत,**

अ) नियोजित घटक संख्या - १६७

ब) नियोजित प्रकल्प खर्च - ६०० कोटी

क) नियोजित उत्पादने - कापड व कापड प्रक्रिया उद्योग

ड) पहिल्या वर्षी अपेक्षित उलाढाल - ३२५ कोटी

इ) रोजगार निर्मिती - ५०००

एफ) प्रकल्पामधील गुंतवणूक - १) सभासदांची गुंतवणूक - २२ कोटी

२) केंद्र शासन अनुदान (एसआयटीपी)- १२ कोटी

३) मुदती कर्ज - १०१ कोटी

४) अनुदान/कर्ज - ६५ कोटी

सदर संस्थेने जागा ताब्यात घेतली आहे. वित्तीय संस्थाकडून कर्ज मंजूर करुन घेण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. संस्थेच्या इमारतीचे व कम्पाऊंडचे बांधकाम सुरु आहे.

**२) मेट्रो टेक्स्टाईल पार्क को-ऑप. सोसा., कागल-हातकणंगले पंचतारांकि औद्योगिक वसाहत,**

अ) नियोजित घटक संख्या - ३५०

ब) नियोजित प्रकल्प खर्च - १००० कोटी

क) नियोजित उत्पादने - कापड व कापड प्रक्रिया उद्योग

ड) पहिल्या वर्षी अपेक्षित उलाढाल - १३८५ कोटी

इ) रोजगार निर्मिती - ८५०९

एफ) प्रकल्पामधील गुंतवणूक - १) सभासदांची गुंतवणूक - १६७ कोटी

२) केंद्र शासन अनुदान (एसआयटीपी)- ४० कोटी

३) राज्य शासन भाग भांडवल - ३१ कोटी

४) मुदती कर्ज - ५२३ कोटी

५) इतर कर्ज - १५८ कोटी

सदर संस्थेने जागा ताब्यात घेतली आहे. वित्तीय संस्थाकडून कर्ज मंजूर करुन घेण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. संस्थेच्या इमारतीचे व कम्पाऊंडचे बांधकाम सुरु आहे.

**३)प्राईड इंडिया टेक्स्टाईल पार्क को-ऑप. सोसा. , तारदाळ, ता. हातकणंगले**

अ) नियोजित घटक संख्या - १४४
ब) नियोजित प्रकल्प खर्च - १०० कोटी

क) नियोजित उत्पादने - कापड व कापड प्रक्रिया उद्योग

सदर संस्थेने जागा ताब्यात घेतली आहे

**४) लोटस टेक्स्टाईल हाय टेक पार्क, गट नं ८१७ खोतवाडी, हातकणंगले**

अ) नियोजित घटक संख्या - १३

ब) नियोजित प्रकल्प खर्च - २२.८५ कोटी

क) नियोजित उत्पादने - यंत्रमाग

ड) पहिल्या वर्षी अपेक्षित उलाढाल - ५४ कोटी

इ) रोजगार निर्मिती - ३००

एफ) प्रकल्पामधील गुंतवणूक - १) सभासदांची गुंतवणूक - १२ कोटी

२) केंद्र शासन अनुदान (जीडब्लूएसएएस)- ५८ लक्ष

३) मुदती कर्ज - १०.२० कोटी

सदर संस्थेने जागा ताब्यात घेतली आहे. वित्तीय संस्थाकडून कर्ज मंजूर करुन घेण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. आवश्यक परवाने प्राप्त झाली आहेत कांही घटक बांधकाम सुरु करीत आहेत

**<u>पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम</u>**

**१. योजना**

भारत सरकारने पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) ही एक नवीन योजना दि. ३१/३/२००८ पर्यंत कार्यान्वीत असलेल्या पंतप्रधान रोजगार योजना (PMRY) व ग्रामीण रोजगार निर्मिती योजना (REGP) हया दोन योजना मिळून एक योजना जाहीर केली आहे. ग्रामीण व शहरी भागामध्ये लघु उद्योग / उपक्रांमार्फत रोजगार निर्मिती करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) ही योजना केंद्र सरकारच्या सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालय यांचे अखत्यारीत आहे. प्रामुख्याने सदर योजना खादी ग्रामोद्योग आयोगामार्फत राबविली जाणार आहे. केंद्र शासनामार्फत मिळणारे अनुदान खादी ग्रामोद्योग आयोगामार्फत त्यांनी निर्धारीत केलेल्या बँकामार्फत लाभार्थीच्या बँक खात्यात जमा होईल. सदर योजना ही नवीन उपक्रम सुरु करणेसाठी बँकांमार्फत दिल्या जाणा-या कर्जास संलग्न अनुदान योजना (Credit Link Subsidy Scheme) आहे

खादी ग्रामोद्योग आयोग [KVIC] राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ [KVIB] जिल्हा उद्योग केंद्र, [DIC], नावाजलेल्या स्वयंसेवा संस्था [NGOs] पंचायत समिती उद्यमी मित्र (मान्यताप्राप्त ) इ. संस्था / कार्यालयामार्फत लाभार्थीची निवड करणे उद्योग / व्यवसाय उपक्रम निवडणे, उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम घेणे इ. कामे केली जातात.

**२. उद्देश**

१. रोजगार निमिर्ती :- सर्व देशभर नवीन सुक्ष्म व लघु उद्योग/उपक्रम स्थापित करुन ग्रामीण व शहरी भागात रोजगार निर्मिती करणे असा मुख्य उद्देश आहे.

२. पारंपारिक कारागिर / रोजगार युवक ग्रामीण व शहरी भागातील बेरोजगार युवक व युवती यांना एकत्र आणून त्यांचे स्वतःचे गावी पांरपारिक उद्योग / स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे.

३. ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे स्थलांतर थाबविणेसाठी पारंपारिक कारागिर, नवीन कारागिर, ग्रामीण व शहरी बेरोजगार युवक यांचेसाठी (PMEGP)अंतर्गत लाभ देऊन रोजागार निर्मिती करणे.

४. ग्रामीण व शहरी भागात रोजगार वाढविणे, कारागिरांचे वेतन वाढीची क्षमता वाढविणे

| लाभार्थीचा प्रकार | लाभार्थीचे भांडवल (प्रकल्प किंमतीच्या) | अनुदान (प्रकल्प किमतीच्या) | |
|---|---|---|---|
| | | **ग्रामीण** | शहरी |
| सर्वसाधारण लाभार्थी | १० टक्के | २५ टक्के | १५ टक्के |
| मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय , अल्पसंख्यांक, महिला, माजी सैनिक व अपंग | ५ टक्के | ३५ टक्के | २५ टक्के |

**३. पात्रता**

१. वय - १८ पूर्ण असलेला युवक /युवती.

२. कौटुंबिक उत्पन्नाची अट नाही.

३. उद्योगासाठी रु. लाखाचे वरील व व्यवसाय/सेवा उद्योगासाठी रु. ५. लाखावरील असल्यास कमीत कमी ८ वी पास असणे आवश्यक आहे.

४. फक्त नवीन प्रकल्पांना योजना लागू आहे.

५. स्वयंसेवी गट [SHG] कोणत्याही दुस-या योजनेंतर्गत फायदा न घेतलेले पात्र असतील.

६. सहकारी संस्था (नोंदणीकृत)

७. उत्पादक सहकारी संस्था

८. चॅरिटेबल ट्रस्ट

**४. योजना राबविणा-या संस्था**

राष्ट्रीय पातळीवर खादी ग्रामोद्योग आयोग [KVIC] मुंबई या एकमेव खादी ग्रामीण उद्योग आयोग नियम १९५६ अंतर्गत स्थापित केलेल्या संस्थेमार्फत योजना राबविली जाईल.

राज्य पातळीवर राज्य निर्देशक, खादी ग्रामोद्योग , मुंबई व खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई व जिल्हा पातळीवर जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी हे ग्रामीण भागाकरीता व जिल्हा उद्योग केंद्र, ग्रामीण व शहरी भागाकरीता योजना राबविणारी संस्था असेल.

KVIC & DIC यांच्यामध्ये NSIC उद्यमी मित्र, पंचायत समिती, नेहरु युवा केंद्र व स्वयंसेवी संस्था याचा समावेश असेल.

**५. वित्तीय संस्था**

१. २७ पब्लिक सेक्टर बँकस्
२. सर्व विभागीय ग्रामीण बँका.
३. मा. सचिव (उद्योग)/मा. विकास आयुक्त (उद्योग) यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या कार्यपथक समितीने मान्यता दिलेल्या सहकारी बँका.
४. शेडयूल कमर्शियल बँका.
५. स्मॉल इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया [SIDBI]

**६. लाभार्थीची निवड**

जिल्हा पातळीवर मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली कार्यबल समिती मार्फत लाभार्थ्याची निवड केली जाईल. सुरुवातीपासूनच बँक अधिकारी यांचा समावेश असेल.

उद्योजकता विकास प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सुशिक्षीत बेरोजगारांनी परस्पर अर्ज बँकेत दाखल केले तरी चालू शकतील, मात्र कार्यबल समितीची मंजूरी घेणे आवश्यक.

**७. बँक कर्ज / आर्थिक सहाय्य :-**

१. सर्वसाधारण अर्जदारास प्रकल्प किमतीच्या १० टक्के बँक आर्थिक मदत देईल व विशेष घटक योजनेतील अर्जादारास ९५ टक्के बँक आर्थिक मदत मंजूर करेल
२. बँकेचे कर्ज ६० टक्के ते ७५ टक्के असेल . १५ ते ३५ टक्के मार्जीनमनी (अनुदान) व उद्योजाकंचे /अर्जदारांचे ५ टक्के ते १० टक्के स्वतःचे भांडवल असेल.
३. स्थिर भांडवल गुंतवणूकीस टर्मलोन व खेळते भांडवल गुंतवणुकीस कॅश क्रेडिट मंजूर केले जाईल.
४. कर्जाची परतफेड ३ ते ७ वर्षात (सूट कालावधी सोडून) करावयाची आहे.
५. बँकेच्या कर्जावरील व्याजदर रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार असेल.
६. नगरपालिका महानगरपालिका व ग्रामीण भागातील ज्या गावांची लोकसंख्या २००१ जन गणनेनुसार २० हजारपेक्षा जास्त आहे अशी गांवे व तालुक्याचे ठिकाण अशा भागातील कर्ज प्रकरणे जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर यांचेकडून शिफारस केली जातात

**. सुशिक्षीत बेरोजगारांसाठी स्वयंरोजगार योजना :-**

**अ) बीज भांडवल योजना** :- (सदरील योजना सन १९७२ सालापासून कार्यान्वित असून, सदरची योजना १९७२ ते ३१ मार्च १९९४ पर्यंत पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, पुणे यांच्या मार्फत राबविली जात होती.) दि.१.४.१९९४ पासून सदरची योजना ही जिल्हा उद्योग केंद्राकडे हस्तांतरीत केल्या पासून ३१.३.०९ पर्यंत एकूण १०८२ लाभार्थ्यांना रक्कम रु ६०१.७६ लक्ष बीज भांडवल रुपाने अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे.

सदर योजनेमध्ये किमान ७ वी पास असणा-या सुशिक्षीत बेरोजगार युवक/युवतींचा व्यापार, सेवा उत्पादनासाठी बीजभांडवल दिले जाते. या योजनेते कमाल प्रकल्प खर्च मर्यादा रु.२५.०० लाख असून बीजभांडवल रुपाने प्रकल्प खर्चाच्या १५ टक्के रक्कम ६ टक्के व्याजदराने दिली जाते .(नियमित परतफेड करणा-यांना व्याजात ३टक्के सूट दिली जाते.)

**१.योजनेचे नांव** :- सुशिक्षित बेरोजगारांसाठी बीज भांडवलच्या रुपाने  कर्ज देणे
**२.योजनेचे वस्तुनिष्ठ स्वरुप :-** (अनुदानाचे स्वरुप, लाभार्थींचा वाटा व इतर)

१) प्रकल्प मर्यादा-२५ लक्ष,
२) स्वगुंतणूक-१० टक्के, आर्थिकदृष्टया मागासवर्गीय /मागासवर्गीय (एस.सी.) बेरोजगारासाठी ५ टक्के
३) जिल्हा उद्योग केंद्राकडून बीजभांडवल- १५ टक्के, (कमाल रु.३.७५ लक्ष),
४) उर्वरीत बँकेचे कर्ज (७५ टक्के)
५) रु.१०.०० लक्ष पेक्षा कमी प्रकल्प मर्यादा प्रकरणांमध्ये आर्थिकदृष्टया मागासवर्गीय /मागासवर्गीय (एस.सी.) बेरोजगारासाठी २० टक्के बीजभांडवल कर्ज

**पात्रता अटि खालील प्रमाणे आहेत.**

१) अर्जदार कमीत कमी ७ वी पास असावा.
२) अर्जदार सुशिक्षित बेरोजगार असावा.
३) अर्जदाराची वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे असावे.
४) उद्योजकाचे महाराष्ट्रातील किमान १५ वर्षे सलग वास्तव्य व बेरोजगार असावा.

लाभार्थ्याची निवड ही तालुकास्तरीय स्वयंरोजगार मेळावे, योजनेची प्रसिध्दीद्वारे प्राप्त अर्जाची छाननी करुन तालुक्याच्या ठिकाणी पंचायत समिती कार्यालय व सिग्मा कक्षावरील उद्योग निरिक्षक यांचे द्वारे करण्यात येते.

**<u>अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे :</u>**

१) बँकेचे संमती पत्र,
२) तीन फोटोसहीत
३) विहीत नमुन्याती अर्ज,
४) शैक्षणिक पात्रता दाखला,
५) शाळा सोडल्याचा दाखला,
६) सेवायोजन नोंदणी,
७) रेशन कार्ड,
८) राज्यातील १५ वर्ष वास्तव्य असल्याचा पुरावा, जागेचा उतारा, जागा भाडे तत्वावर असल्यास संम्मती पत्र/ भाडे पत्र/ करार पत्र,
९) प्रकल्पासाठी आवश्यक निविदा/अंदाजपत्रके,
१०) स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाहरकत पत्र
११) आवश्यकतेनुसार अन्य कागदपत्रे.

**ब) जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना** - सन १९७८ पासून सदर योजना जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविली जाते. रु.२.०० लाखापर्यंत यंत्रसामुग्रीतील गुंतवणूक असणा-या लघुत्तम उद्योग घटकांना या योजनेचा लाभ घेता येतो. प्रकल्पाच्या २० टकके किंवा रु.४०,०००/- पर्यंत सर्वसाधारण घटकांसाठी व प्रकल्पाच्या ३० टक्के किंवा रु.६०,०००/- पर्यंत रक्कम विशेष घटकांसाठी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत ४ टक्के व्याज दराने कर्ज दिले जाते.

या योजनेमध्ये मार्च-२००९ अखेर ३७२ लघुत्तम घटकांना ४९.७०५ लाख शासनामार्फत मार्जीनमनी म्हणून वाटप केले आहे.

१. **योजनेचे नांव** :- जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना

**२.योजनेचे वस्तुनिष्ठ स्वरुप :-** (अनुदानाचे स्वरुप, लाभार्थींचा वाटा व इतर)

१) प्रकल्प मर्यादा-२ लक्ष,

२) स्वगुंतणूक-सर्व साधारण बेरोजगारासाठी १० टक्के,

३) जिल्हा उद्योग केंद्राकडून सर्व साधारण घटकांकरीता देण्यात येणारी रक्कम २० टक्के, (कमाल रु ००.४० ),सदरची रक्कम ४ टक्के व्याजाने कर्ज म्हणून देण्यात येते

४) उर्वरीत बँकेचे कर्ज

**अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे :-**

१) बँकेचे संमती पत्र, २) तीन फोटो ३) विहीत नमुन्याती अर्ज, ४) रेशन कार्ड, ५) जागेचा उतारा, जागा भाडे तत्वावर असल्यास संम्मती पत्र/ भाडे पत्र/ करार पत्र, ६)प्रकल्पासाठी आवश्यक निविदा/अंदाजपत्रके,७) स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाहरकत पत्र ८) आवश्यकतेनुसार परवाना अन्य कागदपत्रे

**. योजना राबविणेबाबत मार्गदर्शक तत्वे:**

१) शिक्षणाची अट नाही.

२) उद्योजक सन १९८१ च्या जणगणनेनुसार १ लाख लोकवस्तीच्या आतील गावातील रहिवाशी असावा.

## ३) उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम (E.D.T.P.)

उद्योजकता विकास (उद्योजकीय व तांत्रिक ) प्रशिक्षण कार्यक्रम (विशेष घटक योजना सर्वसाधारण योजना)

अनुसूचित जाती प्रवर्गातील तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराभिमूख उद्योजकीय तथा तांत्रिक प्रशिक्षण देवून त्यांचा आर्थिक व सामाजिकस्थर उचंविण्याचा व त्यांना सामाजिक न्याय देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने महत्वकांक्षी योजनेचे नियोजन केले आहे. त्यानुसार शासनाने विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसुचित जाती प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगारांना उद्योजकीय तथा तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी दि.७ फेब्रुवारी २००७ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. तसेच सर्वसाधारण योजने अंतर्गत सदर प्रशिक्षणसाठी दि.२९.१०.०७ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. या महत्वकांक्षी व नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत रोजगाराभिमूख व्यवसायिक तांत्रिक व उद्योजकीय प्रशिक्षण देवून आत्मविश्वास वाढवून त्यांना स्वयंरोजगार किंवा रोजगारा करीता आत्मनिर्भर बनविणे अशी योजनेची संकल्पना असून, योजनेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**अ) योजनेच्या पात्रता अटि :-**

(१) उमेदवार हा अनुसूचित जाती प्रवर्गातील असावा (२) उमेदवाराचे वय किमान १८ वर्ष पूर्ण व कमाल ५० वर्ष असावे (३) उमेदवार किमान ७ वी पास किंवा पदवी / पदविका / शासन मान्य मान्यता प्राप्त संस्थेकडून प्रमाणपत्र किंवा किमान कौशल्यावर अधारित व्यवसायाकि अभ्यासक्रम प्रमाणपत्र धारक असावा. (४) उमेदवार जिल्हयातील रहिवाशी असावा (५) उमेदवार कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

**ब) योजनेची अंमलबजावणी**

सदर योजनेची अंमलबजावणी जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर यांचे मार्फत करण्यात येणार आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. उद्योजकता परिचय कार्यक्रम | -१ दिवस | - | अनिवासी |
| २. उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम | -१२ दिवस | - | निवासी |
| ३. तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम | -१५ दिवस ते २ महिने | - | अनिवासी |

कोल्हापूर जिल्हयाकरीता सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाकरीता सदर योजना राबविण्याचे निश्चित केले असून त्याकामी जिल्हा नियोजन व विकास मंडळ, कोल्हापूर यांचे विशेष सभेमध्ये सर्वसाधारण योजने करीता रक्कम रु. ४२.०० लाख व विशेष घटक योजने अंतर्गत रक्कम रु. ५.०० लाखाची तरतुद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

## सामुहिक प्रोत्साहन योजना :-

सामुहिक प्रोत्साहन योजना-२००७ ही योजना ३१ मार्च २००७ च्या शासना निर्णयान्वये अंमलात आली. त्यानुसार सदर योजनेचा कालावधी १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २०११ पर्यंत आहे. सदर योजनेची अंमलबजावणी उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे अधिपत्याखालील जिल्हा उद्योग केंद्र हे कार्यालय अभिकरण संस्था म्हणून कार्य करते. सदर योजने अंतर्गत खालील फायदे देण्यात येतात.

१) इंडस्ट्रियल प्रमोशन सबसिडी (आयपीएस)
२) व्याज अनुदान
३) विद्युत शुल्क माफी
४) मुद्रांक शुल्क माफी
५) रॉयल्टी रिफंड
६) जकात कर माफी

सदर योजनेचे फायदे घेऊ इच्छिणा-यांनी जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, कोल्हापूर येथे संपर्क साधावा.